
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.



REFBK-0020820
REFBK-0020820

नारायण रा. पेडणेकर

२७०८

२०८२०
काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[ क्रु. मा. प. ]

# कस्तुरी मृग

२
वि.ग्रं.
2266
20/20
३१२५

☆

नारायण रा. पेडणेकर

☆

मुख्य विक्रेते :
बॉम्बे बुक डेपो,
गिरगांव, मुंबई ४०० ००४.

मूल्य ५ रुपये

कस्तुरी मृग प्रकाशन, मुंबई.

प्रथमावृत्ती १ मे १९६५

द्वितीय सुधारित आवृत्ति
१ जून १९७५

© सौ. पुष्पस्मिता ना. पेडणेकर

मुखपृष्ठ : पुष्पा त्रिलोकेकर

मुद्रक-प्रकाशक :
नारायण रा. पेडणेकर
कस्तुरी मृग प्रकाशन,
१२, इसाक महमद चाळ,
भवानी शंकर रोड, दादर,
मुम्बई-४०० ०२८.

मुद्रण स्थळ :
रचना प्रिन्टर्स,
राऊत इंडस्ट्रिअल इस्टेट,
मोगल लेन, माहीम,
मुंबई-४०० ०१६.

तीर्थरुप सौ. आईस

REFBK-0020820

REFBK-0020820

# साहित्य-सम्राट आचार्य अत्रे यांनी नारायण रा. पेडणेकर यांच्या नांवे केलेले एक 'खरेखुरे' नि 'अस्सल' वारसा-पत्र (वुईल)

क्रांतीचा झेंडा धरून धारावीच्या [illegible] झोपडी-
पर्यंत गेलेल्या [illegible]! मर्दाची बेडर हिंमत,
उद्दाम राग आणि क्रांतीची बेहोषी नारायण
पेडणेकर ह्यांच्या कवितेच्या ओळीओळींत आहे
आकाशाकांत कुटुंब धरलेली आहे. कामगार वर्गाच्या
जीवनक्षितिजावर हा एक नवा तेजःपुंज शाहीर
उगवलेला आहे असे त्यांचे काव्य वाचून
कोणाचीही खात्री होईल. ह्यांच्या (महाराष्ट्राच्या) हा 'मायको-
व्हस्की' होणार नाही कशावरून? माझे धन्यवाद
नि आशीर्वाद.

मुंबई १ मा. १९६५

प्रल्हाद केशव अत्रे

# कस्तुरीमृग !

कस्तुरीचा मृग स्वत:भोंवतीं घुमायचा
तेव्हां सारा पुरुषार्थ सार्थ असायचा !

प्रलोभन् नव्हतं तेव्हां सुवर्णाच्या मृगाचं
पोटांत नाहीं भूक पण चांदणं होत भूलीचं
मनाच्या प्रत्यंचेला असा कांहीं ताण होता
पोटांत धग्धगतां भूक भली अचूकवेधी बाण होता.
चांदण होतं भूलीचं पिसंच ठाकतं मनांत
वळापिळाचा दंड न्याहाळतां रातींत मुडदे सिंव्ह सात !

झऱ्याझऱ्यांत साखर असायची
चाखल्या वेलींत कैफ असायचा
लाजेला लाज असायची
धरतीची बाज असायची
रानफुलं साज साजायची
तुडुंब स्तनांत हांक देणारा ईश वसायचा
कस्तुरीचा मृग स्वत:भोंवतीं घुमायचा !

मी माझ्या गुहेंमध्यें चूर असायचों
अनंताची हांक येतां दूर असायचों
अनंत धारांनीं अनंत खालीं बरसतांनां

अनंत तें बिजलीच्या गर्जनांत गरजतांनां
अशीच एक लखलखती वीज चमकते
लखलखींत गौरांगी मूर्त उजळते !
अनंताचें भान हरपतें
अनंत तें तिथेंच स्थिरतें
कोण कुठून आलिस कां ?
चांदणेच ल्यालिस कां ?
चांदणेच न्हालिस कां ?
तुडूंब स्तनांत हांक देणारा ईश वसायचा
कस्तुरीचा मृग स्वतःभोंवतीं घुमायचा !

# पूर्वसूत्र

हें पूर्वसूत्र खंडित झालें तर
जगांत उरणार नाहीं अस्तित्त्व कसलेंच अस्तित्त्वाला
या पूर्वसूत्राशींच निगडीत झाला आहे परमेश्वराचा श्वासनि-श्वास
परमेश्वराच्या त्या निश्वसनालाच येईल बाधा
पूर्वसूत्रासाठीं तरी ही " भांडवली संधि " साधा रे साधा !
आम्हीं इथें कांहींतरी युगेंयुगें जोपासलेलें आहे
हा वीर्यगंध युगांचा मिंधा आहे
ह्या मिंधेपणासाठीं तरी तृप्तपणें पाहूं दे मला
माझ्या × × × × वरील रसरसलेला तांबूसपणा
अरे ! इथूनच तर माझ्या अस्तित्त्वाचे
सहस्रकिरण दशदिशांचा ग्रास करीत निघाले आहेत.
श्वासांना जाणवतेंय तें ओझें नाहीं
उचललेंय तें पावलाचे वजन नाहीं
पाह्यलाय् पाहतोय् तो प्रकाश नाहीं
विलसताहेत ते रंग नाहींत
मी अंधाराशींच सौदा केलाय् उजेडाला जन्म द्यायला !
माझ्या तांबूस × × × प्रचंडचंड-परिमाणी अणुकिरणाची आवर्तनें
विश्वव्यापून उरण्यासाठीं निघालेली आहेत.
इथेंच तर खरें अस्तित्त्वाचें अस्तित्त्वाला आव्हान आहे
इथेंच तर खरा जीवन-मरणाला अर्थ नाहीं

माझ्यांतला 'मी' असा दुभंग होतां नये
त्यांतूनच पसरतील भूखंडावर आणविक-जंतू-दूषणं
आणविक-जंतू-दुषणानें सारा भूखंड जाळीन् म्हणतोय मी—
त्याच तर एका पूर्वसूत्रासाठीं !
म्हणून तर मी या गल्लीमध्यें उभा आहे
माझ्या हातांतील सुर्‍याचें पातें नग्न आहे
गल्लींत भरून राहिला आहे तो माझाच आवाज
'आवाज द्या !' 'माझ्या सुर्‍यांच्या पात्यावर मुडदे व्हा !'
'अजून आव्हान स्विकारलें नसशील तर —
तुझ्या बहिणीची × × म्हणतों !'
मी थांबणार नाहीं, मुडदा होईन—
पूर्वसूत्राच्या आदेशानें !
हो. खरंच–आतां प्राजक्त टपटपूं लागलेला आहे
प्राजक्तदेठांच्या तांबड्या राशी तुझे-माझे श्वास सोसून
गळल्या आहेत.
आतां रडूं नकोस ग. ही प्रणय-रात्र युगांपूर्वींच सुरूं
झाली होती. रात्र कधीं सरतें तें कळत नाहीं
ह्या शुक्रप्रकाशांत आतां तुझ्या वेणीचा पीळ मला पुन्हः घालूं दे !
हे प्राजक्ताचें निर्माल्य देवाचें तुझ्या वेणींत खोवायला सांगू नकोस
तुझाही गर्भ त्या उगवत्या सूर्यासारखा तांबूस असेल, तेजस्वी असेल !
आशिर्वाद आहे हा माझा आशिर्वाद.
मी ! मी ! मी आणि एक पूर्वसूत्र !

# घणाघातांच्या श्वासांचें झालें रूपडें लागट !

घणाघातांच्या श्वासांचें झालें रूपडें लागट
जळणाऱ्या डोळा दिसे माझें भयाण सांवट !

सांवटल्या भयाणांत एक आर्तशी आरोळी
तरीं कवेंत कांपते निळया डोळयांची भावली !

सांवटल्या भयाणाचें भय भिनत राहणारें
सांवरल्या आभाळाचे डोळे निखळ वाहणारे !

झाल्या भयाच्या अंधारा येतें श्वापद शरण
माझा श्वापदाचा ऊर झाला विदीर्ण विदीर्ण !

घणाघातांच्या श्वासांनीं आतां थोडेसें थांबावें
निळया भावलीच्या माथां हातहळवे फिरावे !

---

माझ्यांतला 'मी' असा दुभंग होतां नये
त्यांतूनच पसरतील भूखंडावर आणविक-जंतू-दूषणं
आणविक-जंतू-दुषणानें सारा भूखंड जाळीन् म्हणतोय मी—
त्याच तर एका पूर्वसूत्रासाठीं !
म्हणून तर मी या गल्लीमध्यें उभा आहे
माझ्या हातांतील सुऱ्यांचें पातें नग्न आहे
गल्लींत भरून राहिला आहे तो माझाच आवाज
'आवाज द्या !' 'माझ्या सुऱ्यांच्या पात्यावर मुडदे व्हा !'
'अजून आव्हान स्विकारलें नसशील तर —
तुझ्या बहिणीची × × म्हणतों !'
मी थांबणार नाहीं, मुडदा होईन—
पूर्वसूत्राच्या आदेशानें !
हो. खरंच–आतां प्राजक्त टपटपूं लागलेला आहे
प्राजक्तदेठांच्या तांबड्या राशी तुझे-माझे श्वास सोसून
गळल्या आहेत.
आतां रडूं नकोस ग. ही प्रणय-रात्र युगांपूर्वींच सुरूं
झाली होती. रात्र कधीं सरतें तें कळत नाहीं
ह्या शुक्रप्रकाशांत आतां तुझ्या वेणीचा पीळ मला पुन्हः घालूं दे !
हे प्राजक्ताचें निर्माल्य देवाचें तुझ्या वेणींत खोवायला सांगू नकोस
तुझाही गर्भ त्या उगवत्या सूर्यासारखा तांबूस असेल, तेजस्वी असेल !
आशिर्वाद आहे हा माझा आशिर्वाद.
मी ! मी ! मी आणि एक पूर्वसूत्र !

# घणाघातांच्या श्वासांचें झालें रूपडें लागट !

घणाघातांच्या श्वासांचें झालें रूपडें लागट
जळणाऱ्या डोळा दिसे माझें भयाण सांवट !

सांवटल्या भयाणांत एक आर्तशी आरोळी
तरीं कवेंत कांपते निळया डोळयांची भावली !

सांवटल्या भयाणाचें भय भिनत राहणारें
सांवरल्या आभाळाचे डोळे निखळ वाहणारे !

झाल्या भयाच्या अंधारा येतें श्वापद शरण
माझा श्वापदाचा ऊर झाला विदीर्ण विदीर्ण !

घणाघातांच्या श्वासांनीं आतां थोडेसें थांबावें
निळया भावलीच्या माथां हातहळवे फिरावे !

---

# कविता लिहायला !

वितभर अस्तित्त्व, मूठभर प्राण, हवा एक कागद
आठवणींतलें काजळ पुरेंसें आहे कविता लिहायला !

ओठ उसने दे त्यांतील शब्द टिपायला,
डोळा उघडा ठेव त्यांतला पक्षी टिपायला,
ऊर मोकळा ठेव सताविल् कोणी लपायला,
कविता मी लिहीतांना एकटीच ऐस आहेस तशी —
स्वतःशींच हंसायला !

तूं स्वतःशींच हंस एकटी एकटी–असूं दे एकटाच स्वतःशीं पक्षी
तूं स्वतःशींच चाळव निमिष–त्यांत मावेल अवघे आकाश अधाशी
तूं स्वतःशींच पहा ठिबकतांना–आतांच मी टिपलाय् पक्षी !
आतांच मी पक्षी टिपला, आतांच टिपला डोळा; पुरता मी कोसळलेला
आठवणींतलें काजळ पुरेंसें आहे कविता लिहायला !

# दिठी नसलेल्या घनांधकारीं !

दिठि नसलेल्या घनांधकारीं अज्ञाताचा हात हातिं ये
स्तन-स्पर्शानें शरिर शहारे अज्ञाताचा स्तन हातीं ये !

दिठि नसलेल्या घनांधकारीं नागफणीचें पाप बहरतें
पापांचा बगिचा झालेला चोळगांठिचें दुःख दंशितें !

चोळगांठिची फुलें अबोली अंगभान वाचा अडखळते
अंधारासह उल्का गळली अज्ञाताचें बळ भोंवळतें !

आज अनावर अज्ञाताला नेणिवेंतला आंवरतो मी
प्रेताच्या जळत्या धमनींतील व्यथित उपाधि सांवरतो मी !

---

# आज नवी नश्वरता ती !

आज नवि नश्वरता ती याचिली मी कुणाहून
क्षण पतनाचा सांवरतों ना, आंसु आला उनावून !

तंद्रेचें ये वलय नभाला क्षणिं ह्या एका जाय विरुन्
तृषार्त ज्यास्तव श्वास क्षारतां दूधच गेलें दहिंवडून्
थांब म्हणालों अगतिकतेला जो कोंडियला श्वास म्हणून्
श्वासच तो चळला चळणारा गेलों मी माझाच जळून् !

देहीं तंद्रा कणाकणाला, देह कणकणीं ईश्वर होता
चिरंतनाची हांक ईश्वरा, कणकण पुलकित सुस्वर होता
सृजनार्ता वेदना सांकळुन पापणीस ये शोषशुष्कता
न जीं लागणें नखें लाविलीं हळवी रे ती उकल पिसाटा !

आज नवि नश्वरता ती याचिली मी कुणाहून्
क्षण पतनाचा सांवरतो ना, आंसु आला उनावून् !

# तुटला आईच्या ओंजळीमधून !

तुटला आईच्या ओंजळीमधून निघाला दिशांना बेभान होऊन
नागव्या पावलां शरमिंधी माती राहिला अखेर मातीचा होऊन !
भीकेआधीं नखीं माती उकरिली लाथेने फोडिला मातीचाच ऊर
लाथ हाणियेली ठायीं ज्या मातीच्या तिथें खेळविले नाण्यांचे निर्झर !
मातीमध्यें कधीं लावियेलें रोप मातींत खुशाल पुरियेले पाप
मातींत पावलें चालतां जाळतो कुण्याशा रांडेचा ओला पुष्पशाप !
चालतां चालला उघडा वाघडा बोलतां बोलला शब्दही नागडा
अंधाराला होती अशी दहशत कांतरित वारा निघे नागफडा !
कधीं फुगलेला मस्त असा ऊर कधीं चघळला मस्त असा विडा
सहज टाकली पीक तीमधून थवा पांखरांचा उठे फडफडां !
त्राणांचीं पावलें प्राणांनां बोलती राहिलें पाहिजे मातीशी ईमान
गळलीं पावलें उभीं चालणारीं मातींतच आणि लवंडली मान !
मोहल्ल्यांत होत्या अशा कैक खाटा खाटे खाटे होतें पोरकें कारटें
इथें याची गस्त जागती रे आहे कुणी कसें जावें पोरक्यांच्या वाटे !
इथें या अंधारीं आहे एक खाट खाटेची सावली अजूनही ताठ
दात्या नाहीं दिली मागूनिया भीक आणि आलें तुझ्या भय पाठोपाठ !

---

# मृग बावरा !

सुटला सुसाटत मृग बावरा
उसळल्या मदधुंदशा गंधलाटा
उठला अनोखा अंगांगि साद
हुलकावणीच्या तममूढ वाटा !

वेणाकळा लागल्या जीवघेण्या
डोळयांत आले सांठून प्राण
अंगासभवतीं घुमतात झाडें
झाडांतूनि त्या उठतेय आण !

झाडांत जळती डोळे निखारे
घ्यावा गिळावा अवघा निखारा
रे थांब आतां चुकलों दयाळा,
रे ऐक हा आर्जवांचा पुकारा !

मी कस्तुरीचा मृग मुग्ध वेडा
ठाऊक ना मज माझेंपण
निरगांठीचें दुःख शोधीत आहे
अंगांतलें बघ सरतेंय त्राण !

व्हावींत आतां स्थिरस्तब्ध झाडें
उठुं देत झाडांतुनि काजवा
वेड्या मृगाने चिंबून यावें
पुकारा नभीं जळकळेचा हवा !

# म्हणूं नकोस हात रिता !

म्हणुं नकोस हात रिता हें तर ओंजळभर चांदणें
एकलेपणांत जळति व्यथा हें तर गळा दाटलें गाणें !
दाटुनि गळा तुझा आला स्फटिक तो बरसातिंत न्हाला
दाटलें माथ्यामाधिं काहुर शुभ्रहिम प्राजक्तच बहरला !
शुभ्रहिम प्राजक्ताच्या तळां घातला गळ्यामधें ग गळा
शुभ्रहिम स्तनीं तुझ्या सांचली, चाखली हळवी साखरकळा !
हळव्या मांडीवर स्थिरला माझा माथा भरलेला
माथा मांडीवर होता पांघरूनि मांडीवरला ळळा !
हळवी दुभंगली मांडी हळवा दुभंगला तो ळळा
भरला रिता न हो माथा माझा आज दाटला गळा !
म्हणशिल आतां हात रिता हें तर ओंजळभर चांदणें
एकलेपणांत जळति व्यथा हें तर गळा दाटलें गाणें !

# आता सारेच तुम्हीं तुटून पडा !

आम्हीं या जगीं अस्तित्त्वीं आहों याचीही थोडी दखल घ्या
तुम्हीं गजबजून निघालां आहांत ते तसेच निघा
' धोका ' आमच्यापासून नाहींच तुम्हांला
तुम्हींच सरलायुत आमच्या अंगाहून
माथ्यांत भरलेल्या चांदण्यांत आम्ही मश्गूल आहोंत
सारीं सारखीं फुलंच कोसळताहेत अंगफुलल्या वृक्षाहून
आम्हीं गंधानं कोंदलों आहोंत; आम्हांला नुरलेयत श्वास
इथं ' धुम्रपानाला बंदी नाहीं '—

तुम्हींच थोडे वळवतां येणारे मुखडे तुमचे वळवून घ्या !
तुम्हीं म्हणाल तर अंगें तुम्हांला आंखडतां येतात
तुम्ही म्हणाल तर अंगें तुम्हांला जोखडतां येतात
आज तसे गात्रक्षीण नसलों तरी गात्रहीन आहोंत
आज आम्हीं आहोंत तसे तल्फेसारखे,
तुम्हीं सोडतांयु त्या ' वलयाकार स्वयंगत ' धूरासारखे
तुम्हांला धूरानं माखायचंय् आकाश. खुशाल माखा
आम्हीं म्हणतोय् आतांच उजाडतंय्. आम्ही पहातोय् सूर्य उजळता !

आतांच उजाडतंय, सूर्य पाहून मी निद्रीस्त होइन
अनिमीष जागरणाच्या नीख रातींतून ती उठून गेलीय्
मला माझी मिठी वाटतेय् सैल नि क्षिणांग फुलं अंग क्षिणवताहेत
पांखरं किलबिलतील पण गंध सतावणार नाहींत
आतां सारेच तुम्ही तुटून पडा गिधाड होऊन !

———

# बलात्कारांच्या हातांनों !

बलात्कारांच्या हातांनों ! आज अंधार दाटला
जिता जागता मवाली माझ्या भयाने फाटला !
दिसा उजेडीं—नागवा दिला पाषाणास ळळा
झाला अंधार नागवा आज दाटलाय गळा !
मवाल्याच्या गळयांतली शीळ शिणलीय आज
मेला खाजेचा मवाली ! हुंदकारतेय बाज !
आज अंधार दाटला ' मेला ' मवाली उठला
शल्य मवालीपणाचें, दाट अंधारीं सुटला !
बलात्कारांच्या हातांची हातीं प्रार्थना जुळावी
जिता जागता मवाली त्याची वाट न खळावी !

---

# आंतपणा कोंसळला !

आंतपणा कोंसळला नभ स्तंभाहूनि ढळलें
जखडलेत पाय इथें विळखलेत पदर-पिळे
खवलेपण सतत पुढें जखम खोल खोल जळे
नखिं खणल्या धुळींतुनी दुश्मनली वावटळें !
स्तनशिखरांहूनि सुटलीं भुक्तचोंच पक्षिदळें
सांवरल्या पदरांतील बावरले पक्षि खुळे !
पदराच्या फडफाडिने आगीचा देठ उले
आग भरून भिरभिरलीं माथ्यावर यानदळें !

# आगलेोळश्या पदरामधुनि !

आगलेोळश्या पदरामधुनि जळणारा जो येतो वारा
जळतो जखमी पक्षि आधिंचा जळत हा शोधला निवारा !

कळल्या कुशलांच्या कांट्यांनां हिरवें हळवें फुटतें पान
हळव्या पानशिरा क्षिणलेल्या ओकतात कोयळचें गान !

उरलेल्या निःस्त्राण हातिं या ओंजळिला ग रक्तगंड ऊन
उरतो डोंगर माणुसघाणा उरतें जखमीसें श्वापदपण !

डोंगरपाठीं सांचत रहातें मरणकळेचें बर्फगारठें
बर्फांमधल्या प्राजक्तांतुन गळतीं टपटप सुन्न सांवरें !

# एक मवाली !

एका मवाल्यास म्हणे होता अंधारसामील
ठाकतां तो आकस्मिक नसे पापाला चाहूल !
मवाल्याच्या हातांतील पातें लखलखणारें
पुढें ठाकल्या मृत्यूचा दिल रोख जोखणारें !
दिला मवालाच्या होती एक लागोनिया बया
तीगा इमाना चळतां उभी चिरियेली बया !
ऐसपैसशा अंगाला होता ऐसपैस वेश
खूप झिंगला मवाली डोळां सामावेना जोश !
भल्याबुऱ्याचाही त्याचा होता सोपासा आडाखा
पायीं अडल्या श्वानाच्या पाठीं शिवीचा तडाखा !
अशा मवाल्यानें दिली कैकां मरणाची हूल
ठाके मरणाच्या पायीं नव्हती मरणा चाहूल !
केला मरणाशीं सौदा एका गाफिलशा क्षणा
कैस सोसणें तयाला त्याचा गळलाय कणा !
गल्ली आजच बोलली झाला मवाल्याचा खून
एका वेश्येच्या संपली म्हणे सौभाग्याची शान !

---

# आणि ही पोलीसाची शेवटची गस्त आहे !

देहभानाच्या अभावांत देहद्रोही कुत्रें तडफडत आहे.
आणि श्वानजीभेचा तो माणूस लूत लागून सडत आहे !
त्या कुत्र्याला आणि त्या माणसाला...कुणितरीं......
आतांच्या आतां गोळी घालून ठार केलें पाहिजे !
त्यावांचून त्याची तडफड थांबणार नाहीं.
आणि ही लुतलागणही संपणार नाहीं.

तो आईच्या मांडीवरून कधीं उतरला, त्याची आई कधीं मेली.
हें त्याला कळलें नाहीं. कळल्यावर डोळ्यांतून टिपूसहि आलें नाहीं.
त्याचा बाप मात्र होता तो खूप झिंगणारा
होता तसाच धटिंगण, आल्यागेल्याच्या सुनेलेकी वखवखून पहाणारा
त्याला त्याच्या बापाने जन्म दिला, हें त्याच्या बापालाही ठाऊक नाहीं
त्याच बापाचें हें कार्टें कुत्राकुत्रीच्या उनांतल्या शृंगाराकडे—
सतृप्त पहात राहातें !
डांबर निवते. रात्र होते. कुत्रीं भुंकतात !

तो तिथें त्या खाटेवर पालथाच घोरत पडलेला असतो
फुकट स्रवून संपुष्टांत आलेल्या त्याच्या वीर्याचा
त्या खाटेखालीं खडक झालेला आहे
आणि वीर्यगंध दहा दिशांना पसार होऊन—
तो इथें वेडावलाय् त्या वीर्यगंधासाठीं !

अश्वत्थाम्याच्या अस्सल अवलादीची भयंकर भुतें
किंकाळत असतात, धिंगाणत असतात —

चाळीच्या बोगद्यांतील त्या त्याच्या खाटेभोंवती.
पण त्यांतल्याच एका भुताला तो वखवखून कवटाळतो
भुतछाया गंधहीन असाव्यात, या अनुभवाने तो
भुतछायेशीं लगट करतो !

मरणालाही भेडसावणारी ती लुतलागण थांबणार नाहीं.
त्या कुत्र्याला आणि त्या माणसाला ······· कुणितरीं—
आतांच्या आंता गोळी घालून ठार केलें पाहिजे.
ती कुणी घातलेली नाहीं. तो अजून मेलेला नाहीं !

देहभानाच्या अभावांत देहद्रोही कुत्रें तडफडत आहे.
आणि चांदण्याचा लखलखीत पक्षी आपल्याच
दिमाखांत फडफडत आहे !

अश्वत्थाम्याच्या अस्सल अवलादीचा भयाण हुंदका
गल्लीमधून निसटला आहे;
आणि, ही पोलीसाची शेवटची गस्त आहे !

———

# कण्यांत एक उधाण आणखी-!

कण्यांत एक उधाण आणखी उरांत जखमी पक्षी ग;
उरांत उरला गुदमर नुसता फडफडतो तो पक्षी ग !

वीर्यधुसरसें गंधवलय हें, प्रलय दाटतो मुठींत ग
प्रलंयकर मी कवळूं पहातों कण, तृण, डोंगर मिठींत ग !
कणतृणांत डोंगरांत हांका, प्राणि दाट तें दिठींत ग
कुठें तुझें कोमलांग आहे, बघ वणवा ये पेटत ग !
आज पेटलें रान. शरविधें-श्वापद पळतें ठिबकत ग
कोण श्वापदा रक्त गिळिल हें, रक्तच आहे, ठिबकत ग !
वीर्यधूसरसें गंधवलय हें, पळेल श्वापद कुठवर ग
श्वापद-हृदयीं केवळ राहतो भयकातरसा गहिंवर ग !

कण्यांत एक उधाण आणखी उरांत जखमी पक्षी ग
उरांत उरला गुदमर नुसता फडफडतो तो पक्षी ग !

---

# सिंह-जांभयी !

विरतां विरतां सिंव्ह-जांभयी
पान पान नाहलें उन्हांत
रानीं गहनीं हळवा वारा
हळवा झरतो सूर मनांत !

रान गहन घन कण कण कण्हतें
व्याकूळले सिंव्हाचें प्राण !
रान गहन घन खण खण खणलें
सिंव्ह-कण्यांतील सरलें त्राण !

प्रतिबिंबें सांवटलीं भोंतीं
सिंव्हानें पाहियले सिंव्ह
सिंव्ह मनांतील झुरून मेले
आतां भोंवळूं दे हा देह !

रानीं गहनीं इथें मुशाफिर
गर्ज घुमवितो पानोपानीं
रतिरग-जागीं पुष्पांगी ती
निश्चल व्हावी शुद्ध हरपुनी !

---

# चांदण्याचा शेला !

वेढलेला कंबरेस होता चांदण्याचा शेला
उभा बुभूक्षित म्हणे तसा चांदण्यांत मेला !
चांदण्याच्या शेल्यासाठीं पाय गहाण टाकले
पाय चाललेच नाही आणि शरीर वांकलें !
हातांतल्या हत्याराला नाहीं रक्त गा पाजलें
हातीं हत्यार गळतां मला चांदणे खाजलें !
गहाणाच्या पायासाठीं आतां द्यावें तरीं काय
आतां झालाय उशीर वाजे मरणाचा पाय !
बुभूक्षिता मरायचें मर मारून म्हणावें
पाय खरिदता त्याच्या पायीं मरण कण्हावें !
इथें कण्हलें मरण, झाला गीताचा चरण
पायांमागूनि येणाऱ्या माग पुन्हःही मरण !
येत्या मागूनि ! प्रियेची घाल पिळदार वेणी
चांदण्याच्या शेल्यांतील येरे कंबरेच्या त्राणीं !

—

# पिटाळून लावण्याची एक दुष्ट प्रक्रिया !

पिटाळून लावण्याची एक दुष्ट प्रक्रिया
जिंकून राहिल्याचा दांभिक आवाज;
दिलाच्या जखमा विसरण्यासाठीं
वार करतोंय् ते हवेंत आज.
शत्रू समोर नसतो, असतो अचानक पाठीमागे
तूं तर तोंड देऊन राहिला आहेस.
मुठीला मूठ दिलीय्, दिठीला दीठ
तूंच तुझा शत्रू आहेस.
तुझ्या मुखीं येऊं पहाणारी एक ग्लानी
तुला तुझा शापच देईल दगाफटका
मूर्तिभंजकासमान तूं पुढें सरकलास बेगुमान
अन् आतांच कुठल्या सतावतायत हांका ?
ह्या 'अनेकां'शींच निघायचें होतें तुला ना एल्गारत
पण एकाकीच असा लागलास झुंजीं माझ्या एकट्याशीं
अरे, मी तर तुझा 'वर्मपुत्र'! मी तुझें मरण प्रत्यक्ष !
आज तुझी गांठ पडलीय्—
ती तुला प्यार वाटूं लागलेल्या त्या साक्षात मृत्यूशीं !
माझा स्विकार कर.
वार करण्याचा प्रयत्न आंवर.
शरण ये ! शरण ये !
संपेल ही पिटाळून लावण्याची दुष्ट प्रक्रिया
विरतील हे जिंकून राहिल्याचे दांभिक आवाज !

---

# पक्षी !

वटवाघळागत टांगलेल्या वासना
सुलट्या करून पक्षी केला
झेंप घेतली ती कुजलेल्या अंधारांतून
तापलेल्या चांदण्याकडे.
अंग अंग रसरशीत असतांनां
दोन कोरड्या शब्दांचें गाणें केलं
तुझ्या श्वासानं चाळवलेल्या वाऱ्याची
माझ्या ओठीं शीळ झाली.

शीळ घालीतच निघालों होतों
पण, गर्दीतून येतांनां चेहराच हरवला !

चेहरा हरवलेल्या मला तेव्हां पोलिसानें ठरवलें मवाली !
पण, मी मवाली आहे हें पटलें नाहीं--
पोलीसकोठडींत भेटलेल्या एका मवाल्याला !
'मवाली' माझ्यांतला पटवणार होतों मूठ वळवून—
पण, हात पुढें गेले होते तुझ्या माथां फूल खोवायला.
मवाली म्हणाला चक्क माझें नाक ओढून
"तूं वटवाघूळ आहेस !"

आणि खरोखरच पोलीसकोठडींत अंधार झाला
त्या अंधारांतच मी मला उलटें केलें नि—
मी एक पक्षी झालों !

अंधार कुजतो आहे; पक्षी फड्फडतो आहे !

# ईमान जखमी, अवघड मान !

इमान जखमी अवघड मान
पंख गळूनि आकाश लहान
' घे घे ' घेतां झेंप महान्
पंख गळून अन उडले प्राण !

चोंच वासली चोंच लहान
मूठ वळविली मूठ लहान
चोंच रिती अन् मूठ रिती
थेंबचभर आकाश महान् !

चोंचितून गळला चारा
मुठीमधें उरला वारा
प्राणांचा पक्षी झाला
दिशां दिशां शोधी थारा !

---

# कोण हें कुरुक्षेत्र ? कोण हा रक्तचिखल ?

जागतेपणींच्या विस्फारलेल्या डोळ्यांत
चक्क आम्हांला पडलेलें स्वप्न.
त्या स्वप्नांत –
भली लठ्ठ काळीकुट्ट घूस एक खुडखुडत राहाते.
घूसच ती. वय नसलेली शेंबड्या नाकाची काळीकुट्ट कुरुप आकृति.
तिच्या अस्तित्त्वाला धार असावी कातरणारी
नसती बला. बकाल चाळींतील बालंट घेणारी भलती बाई.
आम्हांला काय कारण तिच्या वार्तेला जायचें ?
तरीं तिनं यावं. भांडण उकरावं. भांडणाच्या रूपाने लगट करावी.
करावेत सारखे हातवारे ऐसपैस.
तिच्या हातवाऱ्यांच्या आंखूड सूचनेंत आम्हीं कसे मावणार ?
ऐलपैल ना, तीर नसलेले
आम्हीं अथांग ... खोल ... प्रवाही ... थारा नसलेले.
आमची चौकशी त्या तिच्या डोळ्यांच्या चिखल डबक्यांत
कशी सामावणार ?
आम्हांला कधीं पोरपणाची अवस्था होती, हें आम्हांला हल्लीं
पटेनासेंच झालें आहे.

आम्हीं इथूनच पुढें सुरू होतों.
आणि सुरू झाल्यावर पाठीमागे उरतों शून्य !
आम्हांला भेटलेले आहेत अनेक आशिर्वाददाते

त्या महात्म्यांच्या वरदहस्तांच्या छायेंत पुष्टावलेंत आम्हीं—
वाढलों आहोंत आम्हीं.

त्या पुष्टीच्या तलफेंत चूर हरवून राहिलों आहोंत आम्हीं
आमचें शरीर !

शरीराचें तें काय इतुकें ? आम्हीं आहोंत रक्तओढीचे रक्तमात्र
भळभळणारे.

त्या थेंब्राचें भाग्य आमचें छाताडांतून ओघळलेल्या खिस्त–गांधी,
लिंकन–केनडींच्या !

तो आम्हीं रक्तमात्र एकच थेंब !

त्या थेंबाला स्पर्शून जावें त्या धुशिनें ?
कोण हें कुरुक्षेत्र ? कोण हा रक्तचिखल ?

# अंग याचि-!

पांखरांच्या फडफडीचा पापण्यांनां नूर आला
पापणीच्या काजळाचा काळजाचा सूर झाला !
दाटलेल्या त्या उराचा श्वास लागे दशदिशांनां
चिंब भिजलेल्या शरांचें काळजांतिल भय सशांनां !
ये निखारोनी दुपार सर्प ' तूं-मी ' ठेंचतों
तमभयानें नग्न होतां तम मला हा खेंचतों !
त्या तमाच्या मसलतीनें हात माझा सर्प झाला
स्तन तुझा कुरवाळुनिया या कण्यांतिल सर्प मेला !
घाल ये आतां गळ्यांत ती तुझी ग सर्पवेणी
आज मी भिनलों तुझ्यानें वासना ही जीवघेणी !
वासनेच्या त्या फणेंत कोर माझा मृत्यूलेख
सर्प हा हाणूं नको ग अंग याचि मृत्यूडंख !

# पाप !

दाराखिडकीचें झडप लावून झाल्या अंधारांत राहिलें पाप उभें
दाढी गुळगुळीत करीत असतांनां आयन्यांत दुभंगलीं नभें !
आयना चेहरा दाविना म्हणून वस्तऱ्याने कापला गळा
गळ्यांतलीं तान रक्तांत मिसळली नि पाप सांचलें शब्दामुळां !
शब्द सांडला रांडेपाशीं नि निःशब्द निघालों रक्ताळलेला
शब्द सांडलेल्या सोंवळेंपणाने आज काढलाय् तो पुन्हः गळा !
शब्द सांडून असाच काढावा गळा आणि बडवावेत ऊर
म्हणजे तरीं गोठून राहिलेले निखळतील वितळतील काळजांतले सूर !

# माथें रितें—!

माथें रितें अस्तित्त्व गिळणारें
मुस्त रस्त्याचें डांबर निवणारें
काळ्या डांबरावर चाललें पाऊल
क्षिणलेल्या वादळाला आली चाहूल !

निवलेलें डांबर आभाळ् झालें
मुक्या डोळयांतलें काजळ गेलें
डोळयांत बोडकें उरलें झाड
किवाडांतला पक्षी शोधतोय् किवाड् !

चाळीच्या छपराचा गळला तोल
पालथ्या किवाडिं पक्षि अबोल
किवाडांत झाड मावलें नाहीं
निवणारें डांबर निवलें नाहीं !

---

# वेडीवाकडी वाट आणि–!

वेडीवांकडी वाट आणि वेडीवांकडी वाटचाल
वेड्यावांकड्या वाटे सांगे, वेडे मन, चालण्यांतील वेडे हाल.
तरीं आपलं चालणं हेंच खरं !
वेड्यावांकड्या वाटेच्या नाकावर असते केंस विस्कटलेली एक वेडीशी कहाणी
कहाणीमधलें भूत ओळखिचें गात असत तींच गाणी !
भुता म्हणतां ' गाऊं नको ', तरीं तें वेडें गात असतें;
वेड्यावांकड्या वाटेवरती गाऊन, गात सतावत असतें !
तरीं आपलं चालणं हेंच खरं !
वेड्यावांकड्या वाटे फुटतो वेड्या क्षणीं वेडफांटा,
तडक स्मशानांत पोंहचल्यावर मनास फुटतो वेडकांटा !
धडधडणाऱ्या सरणावर मी वेडा निजूनही माझा पाय जळत नाही !
सरण रचणाऱ्यांच्या संवयींच्या हलगर्जीपणाची कींव करीत—
माझा पाय चालत राहातो !
वेडीवांकडी वाट खरी वेडीवांकडी होत राहाते.
वेड्यावांकड्या वाटे असतें सांगत मन् चालण्यांतील वेडे हाल;
तरीं आपलं चालणं हेंच खरं. अन् खरी, वेडीवांकडी वाट आणि
वेडीवांकडी वाटचाल !

# जळछायेचें हिरवें रान !

जळछायेचें हिरवें रान
विद्ध सिंव्हसें झालें भान
उरांत झाला शर शरमिंदा
कण्यांत कण्हतें अजुनहि त्राण !

भक्ष्य अून मातींत लोळतें
रक्तांतिल करपे थैमान
जड झाली आयाळ गळयाला
जड झालें हरिणीचें भान !

जबड्यामधली गर्जरवर्जशी
शरण प्रार्थना गतअवसान
दांत लागल्यावांचुन माझा
नकोस हरिणी टाकूं प्राण !

जळछायेच्या हिरव्या रानीं
निपचित होती प्राण तुफान
श्वासानों ! अडवा रे प्राण
कण्यांत कण्हतें अजुनहि त्राण !

---

# लिहीत होतों एक संक्षिप्त कविता !

अवाढव्य इमारतींना क्षितिजें फुटतात !
काल उगवून गेलेला निर्लज्ज सूर्य आज पुन्हः अपरिहार्यतेनें उगवूं लागतो !
जिंदगीनें खच्चून भरलेली बराक माझी जागी होते.
रात्रभर वारा गेला होता भणभणून्;
पण बराकीला जाग नव्हती.
चोर गेला होता भींत खणून्
पण चोरीचीच दाद नव्हती.
जो तो अंग चोरून निजला असतांना—
बराकींत चोरण्यासारखें तरी काय होतें ?
निजेचीं सोंगेंसुद्धां चोरट्या अंगानें सरपटत होतीं !

रात्रभर वारा जेव्हां भणभणत होता
चांदणी एक निखळू तेव्हां पहात होती
म्हणूनच अगाधाचें पाऊल वाजलें नव्हतें
तेव्हांच ती चांदणी संधी साधून
माझ्यासकट निखळून पडली !

त्या निरवळत्या चांदणीचें दुःख जेव्हां झालें मला,
दुःखच खरें ऊर तेव्हां बडवत होतें
आणि जिंदगीनें खच्चून भरलेली बराक माझी गजबजतांनां
चोरांनीं नागवलासा नागवाच मी तेव्हां—
लिहीत होतों एक संक्षिप्त कविता !

अवाढव्य इमारतींनां क्षितिजें फुटतात !
काल उगवून गेलेला निर्लज्ज सूर्य आज पुन्हः अपरिहार्यतेने उगवूं लागतो !

# मुठींत माझ्या सव्वा लाख !

मुठींत माझ्या सव्वा लाख
लाथ मारीन तिथं पाणी काढीन !
सोनेरी केसांच्या राजकुमारीचा
केंस खुडून राहिलों आहे
दंवांत न्हालें स्वप्न माझें
धुक्यांत दडून गायलों आहे !
कंठ माझा दुण्या खर्जाचा
त्यालाच तेव्हां धार होती
मी उभवल्या गांधिलमाशीची
डंखवेदना अपार होती !
तिचे पाय दंवांत ओले
हिरवळीला आसूं होता
तिनं खुडला गुलाब कळा
डहाळां बहर सांडत होता !
हिरवळीला खंत व्हावी
तिनं पाय उचलूं नये
गुलाब तिनं खुडून आणि
डहाळ तिनं मोडूं नये !
मी म्हणालों, मलाच घे—
बहर घे, धुंद सुगीचा कहर घे
चढावलेला दांत तुझा कैरीसाठीं
गंध फुटेल, वारा सुटेल
रामाच्या चान्नीला चाहूल पटेल
कैरीच ती आधीं ओटींत घे !

नंदनकाननाच्या ब्रह्मकमलावर
मानसांतील राजहंसाचा मुक्त निःश्वास
विसावण्या आधींच
मी मला लपेटलें
त्या तिच्या त्या
चौदा कमानी उखडून निघालेल्या शुभ्र पदरांत !
पदर आतां वारा प्याला
माझ्या अंगा पंख झाला
धुकं वितळलं नि वितळली ती राजकुमारी
नि तरीं मी आहे आज अजून
कौमुदीचा कैफवेग प्यालेला !

# भरपूर भरलेला चोर !

×× चतकोर, भरपुर भरलेला चोर;
अंधाराला वरमुन आहे, निळ्या नभांतिल चंद्रकोर
नीतिचें रेशनिंग झालें, रांगा धरती पापें घोर
ताठ कण्यामधिं हटा पेटला देहइमानी प्राण कठोर !
काजळखिडकी निखळुन पडली, गिऱ्हाईकाचा पडला जोर
दिला मुजोरा परत करोनी वेश्या झाल्या दानतखोर !
दानतखोरी गर्जत सुटली गल्लीमध्यें कसला शोर ?
इष्काखातर मुडदा झाला, तो तर होता ××× चोर !

# आर्त गाणें !

व्यंजनें वगळून स्वरांनीं लिहिन आर्त गाणें
माथा वर उचलतांच सरलीं भिनत विमानें
माथां विमान भिनलें, उगाच खचलीं भानें
व्यालें श्वापद आगीमधें दग्धलीं रानें रानें !
खणला ऊर खोल खोल हुंदका दिला खंदकानें
ओकुन रक्तबोल बोल, आलों. भिडलों प्राणानें
सरपटूं अंगानेंच असा कुठल्या दिशेस आव्हानें
तम हा दाट दाट झाला, थांबव निःशब्द हुलकावणें !

व्यालें श्वापद आगीमधें, व्याली एक आर्त गाय
सरलों व्यंजनांतला मी, उरली दाट तमाची साय !

---

# सरपटतात तीं-!

सरपटतात तीं माणसें असतात आणि फडफडते ती माणुसकी
माणसांतला माणूस सरतो तेव्हां पेटत राहते ती नागसाकी !
नागसाकीच्या ज्वाळांतूनही छिनालपणाची कांतडी बचावते
घरटें-पंछी जळतें जिचें त्या आईचें आंतडें कांचतें !
संपत नसतो तो छिनालपणा, राखेंतसुद्धांही जळतें आंतडें
शेजेजी बाई ओढून नेली; बाहेर लोंबकळलें तेंही आंतडें !
आंतड्या आंतड्याचा पीळ निराळा नागवी होते ती इच्छा एक
स्वेच्छेनेच मी जार झालों. वाट पहातेय् ती वैरिण एक !
काजळतो तो दिवा असतो, ओघळतें तें असतें काजळ्
दिवा धडकतो मालवतांनां, डोळयांतल्या झाडांनां येतेय् भोंवळ !
भोंवळलीं तीं झाडें होतीं. फडफडले ते पक्षी होते
झाडातळच्या हाडप्रवाश्या ! हाडासारखेंच झाड होतें !

---

# फसवणूक !

एक कफल्लक रात्र परंतु तमच्छायेचा गाफिल तांडा
कफल्लकाच्या स्वप्नीं रतल्या नापुरूषाशीं नकस्या रांडा !
देउळ घणघण तें भोंवळलें. देवळामधें लपला जार
उजाडल्यावर नकस्या रांडा सोंवळयाच झाल्या गर्भार !
उजाडतें आहेच आज जर भिडति कपांतिल डोळां वाफा
बापपणाचें श्रेय सांगण्या कितीक कोणी देतिल थापा !
कफल्लकाला आली जाग आणिक त्यानें स्वप्न उसवलें
नव्हती सरली रात्र कफल्लक त्या रांडेनें त्यास फसविलें !

— —

# भिंवबा !

बत्तीच्या खांबाखालून लाल झेंड्यानिशीं—

गल्लींतल्या अंधाराकडे सरकलेला तो भिंवबाच होता !

घोषणा देऊन त्याच्या घशाला कोरड पडलेली म्हणून भिंवबा वाटतो निःशब्द.

त्याच्या डोळयाची भावली हरवून राहाते ती प्रचंड गर्दींत.

तिला गर्दींतून वाट अशी गावतच नाहीं.

त्याआधींच चालत असतो वाट गुत्त्याची भिंवबा क्षिणलेला

असतो त्याचा सारा माथा कुठल्यातरीं व्यथेने खणलेला.

त्याला आतां हवी असते अंगांग झपाटून चढत जाणारी, गडगडत

नेणारी तर्र ऽ तार !

डोळयांतली भावली मग उशिराने भिंवबाला शोधित येते.

पण तिला बत्तीच्या पलीकडे सरकावेंसंच वाटत नाही.

ती तिथं बत्तीखालींच सरपटत राहते. कांहीतरीं शोधीत राहाते.

भिंवबाच्या डोळखांचेतील बुब्बुळगांठ भावलीला असह्य झालेली असते.

प्रचंड गर्दी सामावून घेणारी ती भावली

तिथंच त्या उजेड किटकांच्या पंखाला चिकटून घुमत राहाते.

उजाडतांच भिंवबा येईल पुन्हः त्या गर्दीकडे सरकायला

मग ती भावली बसेल भिंवबाच्या डोळखांचेत !

गात्रांनी गळलेला भिंवबा गल्लींतून बाहेर पडतो आहे लालझेंड्यानिशीं
तुम्हीं साथ द्या न द्या तो आतां घोषणा देईल.
भिंवबाच्या घोषणेंतील आर्त किंकाळीला संपुष्टीं येणे आहे तें —
भिंवबाबरोबरच !

भिंवबा रे, घोषणा दे !
तुला तिचा अर्थ कळो न कळो,
तूं ओरड आणि फाड माझें छाताड.
तो तितका अर्थ ऊरीं भरून मी
त्या बत्तीच्या दिशेने धांवत निघेन—
तुझ्या अंगाचें सांवट शोधित भलेंथोरलें !

---

# एकाच प्रकृतीचे सात रस्ते !

एकाच प्रकृतीचे सात रस्ते जिथं येऊन मिळतात,
त्या गजबजलेल्या नाक्यावर मी झेंडा घेऊन उभा आहे
माझ्या चेहऱ्यावर उमटावयाचे उग्र हावभाव—
अजूनही अप्रगट आहेत.
माझ्या मुखांतून अजून एकही शब्द उमटलेला नाहीं.
माझ्या सोबत्याने थाळी तर कधींच पिटलेली आहे.
नि तरी एकही माणूस माझ्याभवतीं जमलेला नाहीं.

मी माझ्या बिरादराला पुन्हः एकदां थाळी द्यायूला सांगतो.
नि आतां मात्र थाळीच्या प्रतिसादार्थ
माझ्याभवतीं सात इवलीं मुलें जमा होतात.
मला संतप्त शब्दांत सांगायूचा होता सत्तेचा अधःपात;
पण त्या सात मुलांनां सांगूं लागतों मी—
कहाणी एका काळ्या बोक्याची !
" एक पांढरी मांजर व्याली, तिला सात पिल्लें झालीं
तिकडून आला काळा बोका त्याने तीं पिल्लें गट्ट केलीं ! "
कहाणी मी सांगत होतों, सात इवलीं मुलें ऐकत होतीं.
इतक्यांत सात रस्त्यापैकीं एका रस्त्यांतून
एक वेडा दगड हाणीत धांवत येतो.
दगड हाणणाऱ्या वेड्यापाठीं ही अफाट गर्दी असते.
मी माझी झेंड्याची काठी गुंडाळण्याआधींच

ती गर्दी माझ्या अंगावरून सरकलेली असते.
त्या गर्दींत तीं सात इवलीं मुलेंदेखील हरवून दिसेनाशीं होतात.

आणि माझ्या डोळ्यांसमोर—
एक पांढरी मांजर विते
तिला होतात सात पिलें,
एक काळा बोका येऊन्
गट्ट करतों तीं सात पिलें !
एकाच प्रकृतीचे सात रस्ते जिथें येऊन मिळतात !

---

# द्रौपदी !

माझ्यापाशीं दुःशासनाचें हात नव्हते
मी दुःशासन नव्हतो
आणि ती द्रौपदी नव्हती !
माझ्यापाशीं पांच पांडवांचे नेत्र होते
दशनेत्रींच्या त्या दशगंगा
उग्रवादळी रूप धरोनी
झेंपावत...आक्रोशत
उरीं स्वतःच फुटत आहेत !

द्रौपदी ! तूंच स्वतः नग्न झालीस !
पांच पांडवांच्या नेत्रांनीं मी पाहिलें आहे,
दुःशासनाने तुझें वस्त्र फेडले नाहीं !

माझ्यापाशीं पांच पांडवांचे नेत्र आहेत !
द्रौपदी !
त्या नेत्रींच्या त्या दशगंगा
तुझ्या पापांसह तुझा ग्रास करण्यास
झेंपावत...आक्रोशत
उरीं स्वतःच फुटत आहेत !

माझ्यापाशीं दुःशासनाचे हात नाहींत !
त्या हातांना दुष्कृतीचें श्रेय नाहीं

द्रौपदी ! तें श्रेयही तूं मला दिले नाहींस !
द्रौपदी ! तूंच स्वतः नग्न झालीस
द्रौपदी ! तूंच स्वतः दुःशासन कवटाळलास !

माझ्यापाशीं पांच पांडवांचें नेत्र आहेत !
त्या नेत्रींच्या त्या दशगंगा
उग्रवादळी रूप धरोनी
झेंपावत...आक्रोशात
उरीं स्वतःच फुटत आहेत !
आणि मी
पांच पांडवांच्या संवेदनांनीं
मी माझें मस्तक नत केलें आहे !

---

# उद्यां सकाळीं उठण्यासाठीं !

कुणाची बाई कुणाशेजारीं हें जिथें कळत नाहीं
तिथं मर्क्युरी दिव्याचा धुरकट प्रकाश पेंगत आहे
घटके आधीं तिन्हीं सांजा मर्क्युरी दिव्याच्या खांबाखालीं
कुणीतरीं झेंडेवाला आक्रोशून गेला आहे
झेंडेवाल्याचा सप्त संदेश थंड अंधार गिळीत असतांनां
ती कफल्लकांची अवलाद आतां झिंगलेली आहे
क्षणाआधीं धगधगलेल्या चुलींदेखील निवल्या आहेत
मर्क्युरी दिव्याच्या खबाभंवतालच्या अधारी पतंगांनां—
मागूनही मरण नाहीं !
घोंगावताहेत मरण मागत !
आणि तिथं कुणाची बाई कुणाशेजारीं—
हेंच मुळीं कळेनासें झालें आहे !

तो पहा—
त्या झेंडेवाल्याचाच मुडदा पडला आहे—
त्या दीर्घभीषण अंधारांत—
रक्ताच्या थारोळ्यांतून—
उद्यां सकाळीं उठण्यासाठीं !

———

# बुजतबावरा पक्षिपणा तो !

बुजतबावरा पक्षिपणा तो अंगशहारा रंगतरंग
मिरवत फिरतों पुष्पपणा मी पहाड बनलें मातुन अंग
कांठपाट फोडून मनाचे सुसाट सुटते वाट पुढें
साठ दळांचा दुश्मन माझ्या घटत्कोच-अंगीं चिरडे !
गंधदाटलेपणा ससाणा तीरासरशीं दिस कोंसळतो
रात्रीसरसा सुस्तपणा तो कभिन्न अजगर स्वपुच्छ गिळतो !
असें स्वतःला गिळत रहाणे पहाडअंगीं भोंवळ भोंवळ
बुजतबावऱ्या पक्षिपणासह प्रकाश यावा वहात खळखळ !

---

# एक !

साराच पसरलाय भरपूरपणा दुःख सोवळं एकुलतं एक
मी रक्तानें माखलेंय् पुरता आठवतंय् होता तो सिंव्ह एक !
शृंगारून त्या अनेक होत्या आठवतो तिचा तो हुंदका एक
आतां तर ओरखडे अनेक आहेत ऊरांतला खळगा खोल एक !
खूप खूप झुंजेन म्हणतो झुंज ठरावी अखेर एक
चोरपावलें अनेक वाजताहेत अखेर विजयी मृत्यू एक
एक तो भुका सिंव्ह यावा, भला एक त्यानं जबडा पसरावा
अनेक अंगे दूर सारून भला एक माथा त्या जबड्यांत द्यावा !

---

# ह्या भल्या पहांटे !

ह्या भल्या पहांटे तूं धुक्यांत ग कां ?
अंग गोरे भिजवीत दंवात ग कां ?
आतांच इतुक्यांत मी स्वप्न पहात होतों
कैक दिसाच्या त्या माझ्या स्वप्नाच्या वैरिणी !
स्वप्न माझें तें मोडलेंस कां ?
ह्या भल्या पहांटे तूं धुक्यांत ग कां ?
अंग गोरें भिजवीत दंवांत ग कां ?

आज आहे पहांट खरी, धुकं खरं पण दाट कां ?
भिजतंय् अंग गोरं, त्यांत इतका चांदण्याचा थाट कां ?
सारं कसं खऱ्यासारखं, 'ऐट' तुझी पण स्वप्नामधली
पण माझ्या कॅमेऱ्यांत्ली ऊन खाणारी बाहुली—
तुला टिपायूला ठरते उणी !
तिच्या आक्षेपाला ऊन हवं खरं खरं
आणि तूं तर आहेस स्वप्नासारखी
नि स्वप्न आहे चांदण्यासारखं !
त्या तसल्या चांदण्यांतही मी वेडा गाणीं गातों
आणि तूं तर तेव्हां घुमत असतेस धुक्यामध्यें
भिजत असतेस दंवामध्यें !

सलत्या व्यथांच्या शय्येवर तडफडता
खराखुरा देह माझा कण्हिताचीं स्वप्नें पहातो;
आणि पुन्हः पुन्हः तूं स्वप्नामधली ऐट घेतेस !
माझं स्वप्न सरलं म्हणून ही पहा पहांट फुलली !
ह्या भल्या पहांटे तूं धुक्यांत ग कां ?
अंग गोरें भिजवीत दंवात ग कां ?

# फक्त पसारा !

पुष्पकळ्यांच्या निःश्वसितांना कुठें कुठेंच नाहीं थारा
अवघड जड शरिरें जडशुष्कपणे पसरताहेत
दिसतो आहे तो केवळ व्याप आणि पसारा
तपकिरीं छप्पर सुस्ती प्यालेले
कोवळिकेच्या उनांत गहिऱ्या झुरत असतें
खूप दूरच्या रानामधल्या हिरव्या दाट झाडासाठीं
झाडामधल्या राव्यांसाठीं
त्या झाडाच्या झुबक्यांत दडलेल्या
गुबगुबीत पांखरांची कोवळी धडपड
इतकी दूरदेखील ऐकूं येतेय् !
पण पायांतळचा कुजट अंधार दुर्गंधून पसरतांना
पाली झुरळांना गिळताहेत !

वर्तमानपत्रांत शस्त्रसंधीची छिनाल वार्ता
रक्ताची उलटी करून राहिली आहे
जिंदगीला कणाच उरलेला नाही;
तिथें निदान 'खुल्या सौद्या'ची भाषा चालू आहे !
पुष्पकळ्यांच्या निःश्वसितांना कुठें कुठेंही नाही थारा
अवघड जड शरिरें जडशुष्कपणे पसरित सुटलीं फक्त पसारा !

---

# काजळ डिखाळ ओल ओल !

काजळ डिखाळ ओल ओल
बुब्बुळदाट भुखाळ ओल
नुमट मुकाळ ओढ सखोळ
खोलच खोल ओढ ऽ ओल !

डिखडिख नसनस बधिर–अतोल
निखळत नसरग स्पर्श–अबोल
स्पर्शस्पर्श हा बोल कलोळ
स्पर्शसत्यशी डिखाळ ओल !

---

# नाईक

२०८२०
काव्य

एक बाई धंदेवाईक, गिऱ्हाईक तिचे तऱ्हेवाईक
तऱ्हा येते विसरून घरीं, नांव मात्र सांगते नाईक !

तऱ्हा तऱ्हा करते बाई, नाईक तरीं ना येती घाई
खूप लढाया मारल्या म्हणतात, गांव सांगतात खुद्द बाई !

बाई म्हणतांच पडतात वळसे, वाटे वाटे भरतात कळशे
वाघ पडतो मरून रानांत, नाईक बरळतात लागलाय् चळसे !

चळ कसला कळा न उरल्या, उरल्या खिशांत फक्त पावल्या
बाई पुढला अंक पुकारते, नाईक नुरलेले उरतात सांवल्या !

येतात नाईक. जातात नाईक. तऱ्हेतऱ्हेचे तऱ्हेवाईक.
पदरमोड मोडीत निघाले, बाई ओळखिची नि धंदेवाईक !

---

# फार !

वय घोंड्याला उंची एरंडाला म्हणतो डिंख खरा
पंख खरे तर पक्षी झाला उरांत डंख खरा !

काखेमध्यें बाल बाइच्या राखेमध्यें पोर उभा
करित राहती नकट्या नखरा सांगत सुटती षंढ सभा !

ओटिंपोटिंचे संचित जळतें दिठींतून पळतात दिशा
पळच पेटलें पाप शोभलें, दिठींतल्या जळजळित नशा !

द्रुणावली वासना ज्या क्षणा उणावलें अस्तित्व तिथें
यारासंगे रतली रांड फार फक्त बापुडे इथें !

# वांझ ! वांझ !

सारेच लढवतात आघाडी, कुणी चालवतात हातगाडी
पिछाडीलाच मजा भलती म्हणतोय बहाद्दर भला गडी.
पुरूषार्थाचें बोलू नकोस तुझी त्याची एकच नाडी
डोंगर गिळणारा काळोख विखाचा त्यांतच विरघळते घडी घडी !

सांजा झाल्या. देऊळ आलें. देव सजले. वाजली झांज
रानावनांत बोध निघाले. अबोध जाणवलें 'वांझ ! वांझ !'

---

# बाप एक मेला !

बाप एक मेला तर खूप पोरं होती रडायला
छातीच केवळ–पोट पिटूं न शकणारी पोटुशी बाईल
विचारीत होता इतक्यांतच का मेला ?
मरतांना त्यानंहि म्हणे जीव अडवण्याचा प्रयत्न केला
अंग ताठवलं नि ताठच झाला.
मग काय ? आंघोळीवांचूनच तिरडीवर नेला

कांहींच नाहीं ठेवून गेला ?
हो. ठेवून गेला. एक आख्खं दुःख. तें इथलंच होतं
आणि होतं ढुंगणाखाली पसाभर रक्त.
जीव अडवण्याच्या प्रयत्नांत अंग ताठवलं तेव्हां ढुंगणांतून सांडलेलं.
आणि त्या रक्तांत, भराभर उतरलेल्या तांबड्या मुंग्या
हुंगत डसत शिरत होत्या, रक्तांत मुंग्या शिरत होत्या
इथंच मी रक्ताला डसलेला जीव पहात होतों
जीव गेला तरीं
रक्त ऊन आपलं ऋण निभावतांना पहात होतों.

पाहिला जीव. पाहिलं मरण. पाहिल्या मुंग्या
पाहिलं रक्त आणि रक्ताला मुंग्यांचं अधाशी डसणं, एका पाठोपाठ
पण त्याआधीं पाहिलं होतंः
तो मेलेला होता तरीं देखील त्याची 'बुल्ली' होती ताठ !

मेला खरा, पण 'बुल्ली' ताठ ठेवून मेला.
म्हणून तर त्याला सरळ सरळ मनांत मी पालथा नमस्कार केला !

# मी असंख्य झालों !

पेटवून पलित्यांच्या ज्वाळा मी असंख्य झालो
पेटवून अंधार दिला बघ जळत पुन्हां आलों !

पालखिने खांदा जड पाय धरे स्थिर होता
पायउभ्या पायरिला कातर हा उर होता.
पायउभ्या पायरिला डंखदाहि आठवणी
प्रार्थनेस थकुं बघत्या हळव्याशा आळवणी.
पाहिन मी खचित तुला तमनिवांत चाळवुन
पलितासा पेटत मी विरघळेन काजळून.
पायांतिल त्राणाला पायरिचे ऋण झालें
पायरिला पाय दिले प्राण पुढे हे आले !

पेटवून पलित्यांची ज्वाळा असंख्यांची रांग
पेटवून अंधार पेटतो पलिता स्वतः अथांग !

२०८२०
काव्य

# गाणे !

हटाहटाचे पट फेडावे,
हेतू तितुके साफ करावे
खटपट बाईला सांगावी
हजार गुन्हे माफ करावे !

हजार फटके घ्यावे मोजुन
कंबर लटकी पडूं न द्यावी
पीकदाणिची सहज इशारत
मजल आंतली समजुन घ्यावी !

उगा नको रे चढता सूर
वेशीपरता टांगून ऊर
दान येथले रोख परत कर
आंत आंत ये भरून भरपुर !

दाटतील ना आतां राने
आतां अवघड झाली वळणे
दर्द-दिलरूबा ठेव ऊरांतच
जडव जडउणें जगणे-गाणे !

---

REFBK-0020820
REFBK-0020820